PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 7, ISSUE 3

# मराठेकालीन बलुतेदारी

**प्रा. डॉ. कैलास भरकड**
इतिहास विभागए
विवेकानंद कला सरदार दलिपसिंग
वाणिज्य विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद
**महाराष्ट्र भारत**

मराठेकालीन वतनदारी ही मुलत: सामाजिक व आर्थिक स्वरूपाची संस्था आहे.वतनदार व्यक्तीची राजकीय सामाजिक व आर्थिक प्रतिष्ठा वतनावरती अवलंबून असल्यामुळे वतनाच्या मोहातून कुणीही सुटलेला नव्हता. ज्यामध्ये परगणे, वतनदार, गाव वतनदार, पेठेचे वतनदार, इतरही वतनदार त्यांची निर्मिती, त्यांचा व्यवसाय, धंदा, परंपरा, धार्मिक विधी, जात कारणामुळे निर्माण झाली असावी. मराठेकालीन वतनदार वेगवेगळ्या विभागात येत असल्यामुळे मराठी प्रशासन हे सरंजामशाही व्यवस्थेचे प्रतीकच होते.कारण वतनदार हे कृषी उत्पादनावर अवलंबून असायचे.मराठे कालीन कृषी समाजात जातीव्यवस्थेचाही समावेश होता. यामध्ये मिरासदार, उपरी बलुतेदार, अलुतेदार यांचा प्रत्यक्षात वतनदार म्हणून देखील उल्लेख येतो. ग्रामपातळीवर प्रशासकीय विभागात हे अधिकारी म्हणून कार्य करताना दिसतात. ‘बलुतेदारी व अलुतेदारी’ ही पद्धत गाव स्तरावर अत्यंत महत्त्वपूर्ण अशी होती. म्हणून मराठेकालीन साम्राज्यात प्रशासनाच्या दृष्टीने ‘बलुतेदारी’ त्यांचे स्थान, महत्व, दर्जा, याविषयी चर्चा करण्याचा मुख्य उद्देश आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जनतेची सेवा करणाऱ्या सेवकांना ‘बलुतेदार’ असे म्हटले जायचे. ह्या बलुतेदारांना ‘ग्रामसेवक’ म्हणून देखील समजल्या जायचे. बलुतेदार हे

गावचे वतनदार ही असायचे. मराठेकालीन बलुतेदार वंशपरंपरेने चालत आलेले काही वतनदार असल्याकारणाने ग्रामीण भागातील प्रशासकीय अधिकारी म्हणून ते गावपातळीवर बलुतेदारांची संख्या साधारणपणे बारा असायची.[1] ही संख्या स्थळ व काळपरत्वे कमी-जास्त प्रमाणात असल्याचे कागदपत्र द्वारे दिसून येते. जसे इसवी सन १४७४ मध्ये खटाव परगण्यातील काही गावांमध्येही संख्या आठ आहे. तर इसवी सन 1597-98 सालच्या वाई परगण्यातील कालवटच्या एका निवाडापत्रात ही संख्या सहा आहे.[2] बलूतेदारांच्या संख्येविषयी विविध विचारवंतांनी आपली मते मांडलेली आहेत. ज्यामध्ये त्यांनी बलुतेदारांच्या संख्येसोबतच कामानुसार वर्गीकरण केलेले आहे. ग्रँट डफ यांनी आपल्या 'ए हिस्टरी ऑफ द मराठा' या ग्रंथात बलुतेदारांच्या दोन याद्या दिल्या आहेत. ज्यामध्ये सुतार, सोनार, लोहार, चर्मकार, मातंग, कुंभार, नाव्ही, परीट, जोशी व मुलाणा व दुसऱ्या यादीत पाटील, कुलकर्णी, चौधरी, पोतदार, देशपांडे, जोशी, नाव्ही, धोबी, सुतार, कुंभार, आणि महार इत्यादी समावेश केलेला आहे.[3] परंतु ही यादी प्रतिनिधिक स्वरूपात ग्राह्य धरणे योग्य ठरणार नाही. कारण कागदपत्रमध्ये योग्यरीत्या बलुतेदारांचा संबोध दिसत नाही. डॉ. अ. रा.कुलकर्णी यांनी बलुतेदारांचे वर्गीकरण तीन विभागात करतात. पहिला- गावांमधील कारागीर आणि व्यावसायिक यामध्ये सुतार, कुंभार लोहार, न्हावी, परीट, चांभार इ. दुसरा- गावातील सेवकवर्ग- त्यामध्ये महार, तराळ, मांग आणि रामोशी इ. आणि तिसऱ्या- गावपातळीवर धार्मिक विधी करणारा सेवक वर्ग- यामध्ये जोशी, गुराव, जंगम, ठाकूर आणि कोळी इत्यादीचा.[4] समावेश केलेला आहे. त्याचबरोबर त्री.ना.अत्रे यांनी आपल्या 'गाव- गाडा' या ग्रंथात बलुतेदारांची संख्या ही 12 असून ती पुढील प्रमाणे दिलेली आहे. चौगुला, महार, सुतार, लोहार, चांभार, कुंभार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुराव व कोळी.[5] एकंदरीतच गावातील लोकसंख्या आणि असलेली कामे पाहता ही संख्या निश्चित केली जात असावी.

त्री.ना अत्रे यांनी बलुतेदारी पद्धती कशी निर्माण झाली, या संबंधीच्या विवेचनात म्हणतात की, 'गाव हे कुणब्यांनी बसविले आणि काळी उचलली व आपल्याला आवश्यक अशा जातींना आपला धंदा पार पाडण्याला व प्रपंचाची कामे करून घेण्यासाठी कुणाची तरी गरज होती. म्हणून कुणब्याने गावात आपल्याबरोबर अडाणी लोकांना म्हणजे पहिले 'कारू' व नंतर 'नारू' यांना आणले. कुणब्याला ज्याचे व्यवसाय जास्त महत्त्वाचे अशा जातीतील लोकांना

'कारू' म्हणत व ज्या जातीतील लोकांच्या सेवेवाचून त्यांचे नडत नसे त्यांना 'नारू' असे म्हणत. कारुला 'बलुतेदार किंवा बलुत्या' आणि नारूला अलुतेदार किंवा अलूत्या असे संबोधले जाई. हे सर्व बलुतेदार व अलुतेदार पेढीकाडी, सलई, भिकणे शेर इत्यादी नावाने ओळखले जात असत.[6] ब्रिटिश प्रशासक विल्सने बलुतेदारांचा उल्लेख 'बळीचा भाऊ' म्हणजे 'शेतकऱ्याचा भाऊ' असा केला आहे. तसेच भारतातील विविध भागात या पद्धतीला निरनिराळ्या नावाने ओळखले जात असे. जसे की, पंजाब मध्ये ग्रामसेवेकांना सेपीदार, राजस्थान व उत्तर प्रदेश तेथे 'कमीने' व खिदमती जनता' गुजरातमध्ये 'वसुवाया' तेलंगणात 'वेट्टीवडू' तर दक्षिण भारतात अनेक ठिकाणी 'अयाकारो' 'अयागारू', 'अयनगंडाळू' किंवा 'अयागार' इत्यादी नावाचा उल्लेख केलेला आढळतो.[7]

**बलुतेदाराची कामे:**

बलुतेदारांना करावी लागत असलेली कामे ही त्यांच्या दाखविण्यात आलेल्या चिन्हावरून निश्चिती करता येते. जसे 1) मेहतरा- चमचा किंवा डाव 2) शिंपी-कात्री 3) चौधरी- तराजू 4) मेहत्तर माळी-फुलाची माळ 5) रंगारी- धोपटणे 6) कुंभार-चाक 7) न्हावी-आरसा 8) महार- इळा दोर, इत्यादीद्वारे त्यांच्याकडे कोणते काम असावे हे दिसून येते.[8] 'बलुते' या शब्दाची 'उत्पत्ती' शोधण्याचे प्रयत्न विद्वानांनी केल्याचे दिसून येते, जसे की संस्कृत शब्द आहे वली (रयत) व अपत्य (वश) अशा काहीनी अर्थ काढला तर काही 'ग्राम' म्हणजे गाय आणि गावात पिकणारे/ निघणार पीक म्हणजे गायची कास (सड) असे गृहीत धरून बलुतेदार हे वासरे होत की जे 'ग्रामरूपी' गाईच्या कासेद्वारे आपला उदरनिर्वाह करत असावे. तर काही विद्वानाच्या मते, 'बलुते' हा कानडी शब्दाचा अपप्रश्न असून तो 'बल' (उजवा हात) 'कुड' देणे असे संयुक्त रुपी शब्द आहे. कारण बलुतेदारांना उजव्या हाताचा महत्त्वपूर्ण अधिकारी युक्त असे मानले जाई. काहीच्या मते संस्कृत भाषेतील 'बलवंत' (बलवान अधिकारी) असा अर्थ अभिप्रेत धरतात.[9]

वरील विवेचनावरून लक्षात येते की, बलुतेदार म्हणजे गाव पातळीवरील जाती संस्थेच्या रचनेतील महत्त्वाचा अधिकारी होता. जो आपली सेवा गावाला मोबदल्याच्या स्वरूपात प्रदान करत असे.

मराठेकालीन ग्राम प्रशासनात बलुतेदार कोणकोणती कामे करायची याविषयी निश्चित अंदाज बांधता येत नाही. कारण बलूतेदारांच्या जातीचा व व्यवसायाचा उल्लेख येत असल्याने ऐतिहासिक कागदपत्रांमधून त्यांच्या कामाला सविस्तर तपशील मिळत नाही. परंतु इंग्रजाच्या महसूली अधिकाऱ्यांच्या उत्सुकतेपोटी ही पद्धत ते समजून घेण्याचा प्रयत्न करीत होते. यामध्ये ग्रँड डफ याने एलफिस्टनच्या या कार्याला मदत म्हणून बलुतेदारी पद्धती विषयी संपूर्ण माहिती गोळा करून त्याला पाठवली होती. डफ यांनी त्यात बलुतेदाराचे हक्क, अधिकार, कामकाजाची पद्धत, त्यांना मिळणारा अतिरिक्त मोबदला, त्या मोबदल्याची पद्धत आणि जनतेतून हा मोबदला कसा वसूल केला जायचा याविषयी तपशीलवार माहिती दिली होती.[10] ग्राम प्रशासनात बलुतेदारांमधील काही बलुतेदारांचे स्थान व प्रतिष्ठा काही प्रमाणात चांगली असायची. हे स्थान त्यांना मिळत असलेल्या कामाच्या मोबदल्यावरून निश्चित होत असे. परंतु अस्पृश्य किंवा अति शूद्र समजल्या जाणाऱ्या बलुतेदारांच्या कामाची व मोबदल्याची निश्चिती नव्हती. बारा बलुतेदार गावातील शेतकरी व सर्व गावकऱ्यांना जातीगत व्यवसायरूप सेवा देत असत. सुतार, लोहार, कुंभार, न्हावी, परीट, गुरव, जोशी, सोनार, मुलामा, यांना वतनी शेत जमिनी व बलुता अशा दोन्ही प्रमाणात कामाचा मोबदला दिल्या जायचा. चांभार, मांग, विशेसत: महार हा ग्रँड डफच्या मते, ग्राम प्रशासनातील एक अत्यंत महत्त्वाचा गावकामगार होता. महाराष्ट्रातील इंग्रज अधिकाऱ्यांच्या मते केवळ महार हा जन्मता: अत्यंत विश्वासू, कार्यक्षम, कार्यरत व हुशार होता. त्याच्या कामाची निश्चिती नव्हती. महारकी हाडोळा, यादवारे तो गावचा राबता महार म्हणून काम करीत असायचा. त्यामुळे जसे काम निश्चित नव्हते. तसेच त्याचा मोबदलाही निश्चित नव्हता.[11]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, गावात बारा बलुतेदारांनी सर्व रयतेची कामे करावयाची असे गावगाड्याचे साधे सोपे वर्णन करण्याचा प्रघात होता. परंतु हे वर्णन एका दृष्टीने अर्थ शून्य आहे. व त्यावरून खऱ्या वस्तुस्थितीची ओळख होत नाही. बलुतेदार रयतेची कामे करतात हे तर खरेच, परंतु रयतेला गावातील बलूतेदाराशिवाय इतरांकडून आपली कामे करून घेता येत नाही, हेही तितकेच खरे आहे. रयतेच्या घरी लग्न असेल आणि गावात वतनदार जोशी असेल तर त्याला बोलवणे अनिवार्य आहे. त्याच्या हातून लग्न लावून घेणेदेखील बंधनकारक आहे. तसे न केल्यास जोशाला नुकसान भरपाई देणे यजमानाचे कर्तव्य असायचे.[12]

**बलुतेदारांच्या कामाचा मोबदला :**

बलुतेदारांना गावाची सेवा किंवा कामाच्या मोबदल्याचे मिळायचे त्याला त्याचे 'बलूते' म्हटले जायचे. बलूतेदारांना देण्यात येणारे अधिकार, प्रतिष्ठा व मानपान हे सर्व गावाकडून मिळत असत. ज्यामध्ये गावातील शेतकरी, सरकारी अधिकारी, व्यापारी आणि मूळ रहिवासी यांचा समावेश असायचा. एकंदरीतच गावाच्या उत्पन्नातील1/10 हिस्सा बलुतेदारांना दिल्या जात असावा. हे निश्चित सांगणे कठीण आहे. बलुतेदारांना बलूते वाटपाच्या तीन पद्धती प्रमुख्याने दिसून येतात. पहिली पद्धत- बलुते वसूल करण्यासाठी बटाईची पद्धत यामध्ये गावातील एकूण उत्पन्नाचा भाग जसा करून ही उत्पन्न जमा करण्याची जबाबदारी गावातील पाटलावर असायची. जमा झालेल्या उत्पन्नातून काही ठराविक हिस्सा बलूते म्हणून बलूतेदारांना दिल्या जात असे. दुसरी पद्धत- गावातील शेतकरी कुटुंबाकडून ठराविक स्वरूपात वस्तू किंवा रोख पैसा 'बलूते' म्हणून दिल्या जायचा. तिसरी पद्धत- बलूते गावातील लोकांकडून रोख रुपयाद्वारे मोबदला म्हणून मिळत असे.[13] हक्क व मानपान बलुतेदारांना मिळणारा मोबदला बहुतेक हक्क आणि मानपानाच्या स्वरूपात दिला जायचा. बलुतेदार गावकामगार असल्याने त्यांना सर्व हक्क व मानपान सर्व गावाकडून मिळायचे. या मानपानाचे निश्चित असे नियोजन नव्हते. गावापरत वेगवेगळे स्वरूपाचे असायचे. बलुतेदारांना मिळणारे मोबदले आणि त्यांचे हक्क व मानपान वंशपरंपरेने होते. त्यांना मिळणार वतन हे सर्व त्यांच्या जमिनींनीहाय कामाशी निगडित होते. त्याला 'वृती' असे म्हटले जायचे.[14] बलुतेदारांच्या मेहनतीचा मोबदला निश्चित नव्हता. तो पूर्वापार चालत आलेल्या परंपरा आणि रितीरिवाजाप्रमाणे ठरवलेला होता.

**बलुतेदार आणि न्यायव्यवस्था :**

बलुतेदार हे गावचे प्रतिष्ठित नागरिक असून गाव प्रशासनात त्यांचा सक्रिय सहभागा असायचा. गोतसभेच्या न्याय निवाड्यापत्रात त्यांची नावे त्यांच्या व्यवसायिक चिन्हासह किंवा निशाणीसह नोंद करण्यात येत होती. मराठेकालीन खेडेगावातील न्यायदान प्रक्रियेत प्रामुख्याने हे बलुतेदार सामील होत असत. बलूतेदार हे न्याय निवाड्याच्या बाबतीत आपले स्वतःचे मत स्पष्टपणे मांडून आपली खून न्यायनिवाड्याच्या कागदपत्रावर उठवत असायचे. जसे कुंभाराचे चाक, न्हावीचा-आरसा, सुताराची-पातळी, चर्मकाराची-आरी, सोनाराचा-हातोडा, महाराची-घुंगराची

काठी इत्यादी याचाच अर्थ असा होतो की, बलूतेदार हा ग्रामरचनेत सेवक या नात्याने जसं महत्वाचा होता, त्याचप्रमाणे तो इतरही बाबतीत महत्त्वाचा होता हे स्पष्ट होते.[15]

डॉ. पी. ए. गवळी हे बलुतेदारी पद्धती संबंधी भाष्य करताना म्हणतात की, गाव गाड्यातील बलूतेदारी ही जातीप्रधान व्यवस्था होती. बलुतेदारी व्यवस्थेमध्ये बलुतेदारांचे सबंध हे शोषणावर आधारित होते. कारण बलुतेदार जे एकमेकांना जोडले होते, त्यातील काही बलूतेदारावरती जाचक बंधने होती. उदाहरणार्थ: महार या बलुतेदाराला चोवीस तास राबवे लागत असे. उत्पादन हक्कावरच्या मोबदल्याची ही श्रेणीबद्ध व उतरड होती. गावकीसाठी सर्व बलुतेदार श्रम करीत असत. त्यातील काही वस्तू निर्माण करीत असत. याकरिता त्या बलुतेदाराला बलते मिळत असे. त्यामुळे त्यांच्या श्रमाचे मूल्य होत नव्हते. म्हणजेच बलुतेदारीत उत्पादनातील सबंध अगदी त्यातील शोषणासहित व्यक्त होत होते.[16] तसेच आपल्या 'पेशवेकालीन महाराष्ट्र' या ग्रंथात असे नमूद करतात की, बलुतेदारी पद्धती आणि जातीव्यवस्थेच्या सहसंबंधातून त्यातील दर्जा व जातीनिष्ठ व्यवसायावरून असे अनुमान काढता येते की, जातिगत अर्थव्यवस्था ही आपल्या चलनवलन बलुतेदाराच्या रूपाने टिकून होती. कारण भारतात भांडवलशाही अर्थव्यवस्था अस्तित्वात येण्यापूर्वी सरंजामशाहीचे जमीनदारी व जात हे मूलभूत आधार होते. पुढे त्यांचे रूपांतर बलूतेदारी पद्धतीत झाल्याचे दिसते. विशेषत: बलुतेदार हे एका बाजूला गावचे सेवकवर्ग म्हणून राबतात तर दुसऱ्या बाजूला जातीय व्यवहार ही तितक्याच कठोरतेने पाळताना दिसतात. परंतु उत्तर भारतात अस्तित्वात असलेल्या 'जनमानी' पद्धतीपेक्षा महाराष्ट्रातील बलुतेदारीचे स्वरूपे अधिक जातहिताचे, समाजहिताचे आणि लोकशाही प्रक्रियेचे अंशतः बीज बाळगणारे दिसते.[17]

एकंदरीतच बलूतेदारी पद्धत वर्षानुवर्षे महाराष्ट्रातील ग्रामीण समाज जीवनात आर्थिक व सामाजिक दृष्टीने पूर्णतः एकरूप झाली होती. विशेषत: ही पद्धत इतिहासाच्या वेगवेगळ्या कालखंडात महाराष्ट्रात झालेल्या राजकीय स्थित्यंतरात देखील वंश-परंपरागत पद्धतीने चालूच राहिली. त्याचे मुख्य कारण म्हणजे शेतीप्रधान ग्रामीण समाजाला त्याची उपयुक्तता किंवा जातीनिहाय झालेली समाजाची विभागणी हेच होती. इंग्रजाच्या आगमनाने एकोणिसाव्या शतकात औद्योगिक प्रगतीचा वेग वाढला. विज्ञान, दळणवळणाची साधने, शिक्षण, नवीन शहराचा उदय आणि सामाजिक व आर्थिक प्रबोधन चळवळीतून ही पद्धत हळूहळू विकोपास

गेली. कालांतराने अनेक बदल घडून आले. लोकशाही युक्त नैतिक मूल्य अस्तित्वात आली. गुलामीयुक्त किंवा वेठबिगारी सारख्या वंश परंपरागत चालणाऱ्या पद्धतीचे महत्त्व कमी झाले. परंतु तत्कालीन ग्रामीण जीवनात 'बलुतेदारी' ही व्यवस्था प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण व एकरूपता प्रदान करणारी होती.

## संदर्भ

१. गवळी पी.ए. मराठ्याचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 1 जानेवारी 1999, पृ. 165.

२. कुलकर्णी अ.रा. मध्ययुगीन महाराष्ट्र, डायमंड पब्लिकेशन्स प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती जानेवारी 2007, पृ. 42, 43.

३. कुलकर्णी अ.रा. शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन पुणे, आवृत्ती पाचवी, जुलै 2012 पृ.23.

४. कुलकर्णी अ.रा. शिवकालीन महाराष्ट्र, उपरोक्त, पृ. 24, 25.

५. अत्रे त्री.ना. गाव-गाडा, (संपादक प्रभाकर निसर्गानंद) नाग नालंदा प्रकाशन, कोल्हापूर संपादकीय आवृत्ती, 17 सप्टेंबर 2011, पृ. 40.

६. आत्रे त्री.ना. उपरोक्त, पु. 39.

७. कुलकर्णी अ.रा. मध्ययुगीन महाराष्ट्र, उपरोक्त, पृ. 39.

८. कुलकर्णी अ.रा. मध्ययुगीन महाराष्ट्र, उपरोक्त, पृ. 43.

९. कुलकर्णी अ.रा. मराठे आणि महाराष्ट्र, डायमंड पब्लिकेशन्स पुणे, प्रथम आवृत्ती मार्च 2007, पृ. 36, 37.

१०. कुलकर्णी अ.रा. मध्ययुगीन महाराष्ट्र, उपरोक्त, पृ.52, 53.

११. कुलकर्णी अ.रा. मध्ययुगीन महाराष्ट्र, उपरोक्त, पृ. 53, 63.

१२. नरके हरी (संपा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, दृतिय आवृत्ती 2008, पृ.106.

१३. कुलकर्णी अ.रा. शिवकालीन महाराष्ट्र, उपरोक्त, पृ. 25.

१४. गवळी पी.ए. मराठ्याचा इतिहास, उपरोक्त, पृ.167.

१५. गवळी पी.ए. मराठ्याचा इतिहास, उपरोक्त, पृ.171.

१६. कित्ता.

१७.गवळी पी.ए. पेशवेकालीन महाराष्ट्र, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 18 मे 2000, पृ. 283, 284.